# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२

E-mail :- desk1@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in


कालमर्यादा - दि.९/१२/२०१६

क्रमांकः ४/आस्था/कं.अधि.माहिती/२०१६/१७६०४

दिनांक : 6 DEC 2016

प्रति,

सहसंचालक
तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सेवा नियमित करण्यात आलेल्या शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील आणि शासकीय तंत्रनिकेतनातील कंत्राटी अधिव्याख्यात्यांची माहिती व संबंधीत दस्तावेज सादर करण्याबाबत ....

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे ज्ञापन क्र.ज्ञायाप्र-२८१५/प्र.क्र.१५०/१५/तांशि-७, दिनांक : १७/२/२०१६

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. न्यायालयाच्या आदेशानुसार तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील आणि शासकीय तंत्रनिकेतनातील कंत्राटी अध्यापकांच्या सेवा — १) शासन निर्णय क्र.ज्ञायाप्र-२०१०/प्र.क्र.११०/२०१० (ब)/तांशि-७, दि.१४/१/२०१५ ; २) शासन निर्णय क्र.ज्ञायाप्र-२८१५/प्र.क्र.३४/२०१५ (भाग-४)/१/तांशि-७, दि. १३/३/२०१५ ; ३) शासन निर्णय क्र.ज्ञायाप्र-२८१५/प्र.क्र.३४/२०१५ (भाग-४)/२/तांशि-७, दि. १३/३/२०१५ अन्वये नियमित करण्यात आलेल्या आहेत.

सदरच्या अध्यापकांच्या सेवा नियमित करताना अनियमितता झाली किंवा कसे याबाबतची सखोल चौकशी करण्याकरीता संदर्भाधीन शासन ज्ञापनान्वये तत्कालीन नाशिक महानगर पालिका आयुक्त मा. डॉ. प्रवीण गेडाम (भा.प्र.से.) यांची **चौकशी अधिकारी** म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर चौकशीच्या अनुषंगाने मा. चौकशी अधिकारी यांनी ज्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या उपरोक्त शासन निर्णयान्वये सेवा नियमित करण्यात आलेल्या आहेत त्या अधिव्याख्यात्यांची माहिती आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यास अनुसरुन असे सूचित करण्यात येते की, ज्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा उपरोक्त शासन निर्णयान्वये नियमित करण्यात आलेल्या आहेत त्यांची माहिती संबंधीत पदवी/पदविका संस्थांकडून खाली दर्शविलेल्या विवरणपत्रात भरुन व खाली दर्शविण्यात आलेल्या दस्तावेजांच्या यादीनुसार दस्तावेज प्राप्त करुन घेऊन, त्याची पडताळणी करुन अचूक माहिती व दस्तावेज विभागीय कार्यालयाच्या स्तरावर तयार ठेवावेत. ज्या वेळी चौकशी समिती विभागीय कार्यालयात येईल त्यावेळेस चौकशी समितीस सदर माहिती व दस्तावेज उपलब्ध करुन देण्यात यावेत.

अ) चौकशी समितीस आवश्यक असलेले दस्तावेज (अध्यापकांच्या कंत्राटी तत्वावर प्रथम रुजू दिनांकापासून ते शासन निर्णय निर्गमित होईपर्यंतचे) :

१. अध्यापकांचे मूळ नियुक्ती आदेश
२. अध्यापकांचा मूळ रुजू अहवाल

कृ. मा. प.

३. अध्यापकांचे मूळ उपस्थिती पत्रक
४. अध्यापकांचे शैक्षणिक कामकाजासंबंधीचे दस्तावेज
५. अध्यापकांचे वेतन देयक

ब) विवरणपत्र :
संस्थेचे नांव :
प्राचार्यांचे नांव : दूरध्वनी क्रमांक : भ्रमणध्वनी क्रमांक :

| अ.क्र. | अध्यापकाचे नाव | विद्याशाखा | कंत्राटी तत्वावरील प्रथम नियुक्ती आदेश क्रमांक व दिनांक तसेच रुजू दिनांक | कंत्राटी तत्वावरील प्रथम नियुक्ती नंतर सेवा नियमिततेचा शासन निर्णय निर्गमित होईपर्यंतचे पुनर्नियुक्तीचे आदेशाचा क्रमांक व दिनांक व त्यानुसार रुजू दिनांक | कार्यरत संस्था (कार्यरत कालावधीसह) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पासून | पर्यंत |

उपरोक्त माहिती व दस्तावेज दि. ९/१२/२०१६ पर्यंत विभागीय कार्यालयाच्या स्तरावर तयार ठेवण्यात यावेत. चौकशी समिती डिसेंबर महिन्याच्या पुढील आठवडयामध्ये केव्हाही विभागीय कार्यालयात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर माहिती प्रथम प्राथम्याने तयार करण्यात यावी. सदरची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण झाली नाही व त्यास अनुसरुन चौकशी समितीस संबंधीत माहिती व दस्तावेज सादर न केल्यास त्यामुळे होणा-या परिणामांची जबाबदारी आपली व संबंधीत प्राचार्य यांची वैयक्तिक राहील याची नोंद घ्यावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य
मुंबई.

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०१६/ 7224
दिनांक: 6 DEC 2016

<u>अतितात्काळ/कालमर्यादित</u>

प्रति,
**प्राचार्य**,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद.
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद.
**प्राचार्य**,शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर

मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई यांच्या उपरोक्त पत्रातील निर्देशानुसार कार्यवाही करुन दि.०८/१२/२०१६ पर्यंत सदर माहिती त्वरीत या **roaurangabad.dte@gmail.com** या ई-मेल आयडीवर सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी मध्ये कार्यालयास सादर करण्यात यावी.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद.

D:\OLD PC DATA\DTE\Desk-4.docx

प्रत:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.